# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICATION/ 37 /2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी कमांक 022- 25401056
दिनांक :–21082017 23

9022
23/08/2017

**–:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–**

दि. ०१.०९.२०१७ रोजी किंवा दि. ०२.०९.२०१७ रोजी चंद्र दर्शनानुसार मुस्लीम बांधवांचा बकरी ईद सण साजरा होणार आहे. बकरी ईद सणानिमीत्त कल्याण शहरात दुर्गाडी ईदगाह येथे नमूद दिवशी मुस्लीम बांधवांचा सार्वजनीक नमाज पठणाचा कार्यक्रम होत असतो. तसेच त्याच दिवशी व वेळी शिवसेना पक्षा तर्फे घटानांद कार्यक्रम केला जातो. सदर वेळी हिंदू कार्यकत्यांना लाल चौकी – दुर्गामाता चौका दरम्यान रस्त्यावर बॅरिकेटींग करून अटकाव केला जातो. यास्तव दुर्गामाता चौक व परिसरातील वाहतूक सुनिश्चित रहावी याकरीता आम जनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र एम.व्हि.ए.–११६/सीआर/३७/टिआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून मी अमित का.काळे,पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे पुढील प्रमाणे आदेश करीत आहे:–

१) लाल चौकी कडून भिवंडीकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **लाल चौकी** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने लाल चौकी येथे उजवीकडे वळून आधारवाडी चौक–वाडेघर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

२) भिवंडी कडून कल्याण आग्रा रोड मार्गे जाणाऱ्या सर्व वाहनांना **दुर्गामाता चौक** येथे **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने दुर्गामाता चौक येथून डावीकडे वळून वाडेघर –आधारवाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

३) कल्याण शहराअंतर्गत दुर्गाडी नाका ते पत्री पुल–कंटेनर , ट्रेलर इत्यादी मल्टिएक्सल वाहनांच्या वाहतुकीस दिवसा व रात्री सर्व वेळेत **प्रवेश बंद** करणेत येत आहे.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही बकरी ईद सणानिमीत्त म्हणजे दि. ०१.०९.२०१७ रोजी अथवा चंद्रदर्शना प्रमाणे दि.०२.०९.२०१७ रोजी रात्रौ ००.०० वा.पासून नमाज कार्यक्रम संपे पर्यंत अंमलात राहिल.

सदर अधिसुचना ही पोलीस वाहने,फायर ब्रिगेड,रूग्णवाहीका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( अमित का. काळे )
पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/– सदरच्या अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीस्तव :–**

मा.आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका,कल्याण.
मा.जिल्हाधिकारी,ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :-

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण.

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/भिवंडी/कल्याण/विठ्ठलवाडी

परिवहन व्यवस्थापक-कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

पोलीस उपायुक्त, परिमंडळ-३,कल्याण व विशेष शाखा,ठाणे.

प्रत:- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर

२/- सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे.

२/- सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :- सपोआ कल्याण व भिवंडी वाहतूक विभाग./प्रभारी अधिकारी, कल्याण, कोनगांव वाहतूक उपविभाग.